**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**

Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148.

Website : www.unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४

फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८

Estd : 1962

NAAC 'A' Grade


जा.क्र.विशेष कक्ष/7511/[illegible]

Shikshan Sanstha's Kisan Veer Mahavidyalaya Wai (Dist. Satara) 412 803 Inward No 52/562 Date 18-7-19

दिनांक : 17 JUL 2019

प्रति,

मा. प्राचार्य,

जनता शिक्षण संस्था, वाई संचलित,

किसन वीर महाविद्यालय, वाई,

ता. वाई जि. सातारा.

विषय : स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावरील शिक्षक पदांच्या जाहिरात मान्यतेबाबत...

संदर्भ : आपला जाहिरात प्रस्ताव जा. क्र. ५२/२१२ दि – १८/०६/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत जाहिरात प्रस्तावाबाबत आदेशावरून कळविण्यात येते की,

१. आपण सादर केलेला तासिका तत्वावरील (CHB) शिक्षक पदांचा जाहिरातीचा मसुदा दुरूस्तीसह मान्य करून सोबत प्रमाणे पाठविण्यात येत आहे.

२. स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्त्वावर शिक्षक पदे भरण्यासंदर्भातील सोबतची जाहिरात ही स्थानिक जिल्हास्तर पातळीवर व विद्यापीठ आणि संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी संस्थेने रू. १६१०/– शुल्कासह मा. समन्वयक, इंटरनेट कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना जाहिरात पाठवावी.

३. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तासिका तत्वावरील शिक्षक पदासंदर्भात निर्गमित केलेल्या क्र.संकीर्ण/२०१८/१८५/१८/मशि–३ दि. १४/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात पदे भरण्यासाठी विद्यापीठाद्वारे सोबतची जाहिरात मान्यता देण्यात येत असून उपरोल्लेखित शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती पदे भरण्याबाबत बंधनकारक असतील.

४. सोबतच्या जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा.विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा.क्र.विससं/उशि/कोवि/३०५२ दि. १५/०७/२०१९ अन्वये ना–हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार जाहिरात मान्यता देण्यात येत आहे, तसेच शासनाच्या या ना हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती जाहिरातीमधील पदे भरण्यासाठी लागू आहेत, सदर पत्रातील अटींना अधिन राहूनच ही जाहिरात मान्यता देण्यात आली आहे याची नोंद घ्यावी.

५. जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील पदांसाठी दि. १४/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकास दोन या पध्दतीने जाहिरात मान्यता देण्यात येत आहे. तथापि सदरची मान्यता ज्या मूळ नियमित रिक्त पदाच्या अनुषंगाने देण्यात येत आहे, त्या रिक्त पदांसाठी संलग्नता टी. १ विभागाची मान्यता असल्याची खात्री करुन संस्थेने तासिका तत्वावरील पदे भरावीत.

६. संस्थेने जाहिरात प्रस्तावान्वये मागणी केल्यानुसार तासिका तत्वावरील पदे वॉक–इन–इंटरव्हयू (समक्ष मुलाखत) द्वारे भरण्यासाठी जाहिरात मान्यता देण्यात आली आहे.

७. संस्थेने जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचे ना हरकत प्रमाण पत्र सादर केले आहे. तथापि जाहिरात मसुद्यातील एसईबीसी, ईडब्ल्युएस व इतर आरक्षणाची पदे भरण्यासंदर्भात शासनाद्वारे अद्ययावत शासन निर्णय, परिपत्रके निर्गमित करण्यात येत असून ती सुधारित/पुनर्सुधारित करण्यात येत असल्याने सदरचे आरक्षण भरण्यासाठी संबंधित शासन कार्यालयाकडून योग्य ते मार्गदर्शन घेवून जाहिरात प्रसिध्द करणे, नियुक्ती आदेश देणे इ. भरतीबाबतची पुढील प्रक्रिया करावी.

८. सदरची तासिका तत्वावरील पदे भरत असताना एखाद्या मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर होणारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर अन्य उपलब्ध मागास प्रवर्गातील उमेदवाराचा 'मुलाखतीमधील प्राविण्यावर आधारीत' तात्पुरत्या नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल, असे आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

९. संस्था/महाविद्यालय यांनी तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची सोबतच्या जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील शिक्षक पदांची भरती या संदर्भातील सर्व शासन नियमांचे काटेकोर पालन करून करावयाची आहे. तासिका तत्वावरील मंजूर पदे आणि त्यांच्या आरक्षणाबाबत विद्यापीठास जाणीवपूर्वक अथवा नजरचूकीने चूकीची माहिती देवून जाहिरात आणि पदभरती संदर्भातील कार्यवाही केल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्था/महाविद्यालय जबाबदार राहील.

To Shelar R.S. & Bodare K.M.

18/07/19

१०. किसन वीर महाविद्यालय, वाई, या महाविद्यालयातील तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्त्वावरील शिक्षक/ग्रंथपाल/शा. शिक्षण संचालक या पदांच्या जाहिरातीस आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, या जाहिरातीसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार/हरकत विद्यापीठास रास्त वाटल्यास मंजूर करून दिलेली जाहिरात तात्काळ रद्द करण्यात येईल.

११. शासनाकडून वेळोवेळी अंमलात येणाऱ्या सूचना, अधिसूचना, अधिनियम, परिपत्रके/शासन निर्णय या सर्वातील अटी महाविद्यालयास/संस्थेस लागू राहतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

PSPande

उपकुलसचिव

उपकुलसचिव
विशेष कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रत : संलग्नता टी.१/टी.२/प्लेसमेंट सेल/लेखा विभाग/इंटरनेट कक्ष

# किसन वीर महाविद्यालय, वाई

सिध्दनाथवाडी वाई—पाचगणी रोड, वाई ता. वाई जि. सातारा —४१२८०३.

**पा हि जे त**

**समक्ष मुलाखती (Walk-in-Interview)**

**संस्थेमध्ये चालू शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (CHB) खालील विषयांची शिक्षक पदे भरावयाची आहेत :**

| क्र. | विषय | तासिका तत्वावर भरावयाच्या पदांची संख्या | अराखीव पदे | आरक्षणाची पदे |
|---|---|---|---|---|
| अ) | शिक्षक :— | | | |
| 1. | इंग्रजी | 4 | --- | 2 ST, 2 OBC |
| 2. | मराठी | 2 | 2 | ---- |
| 3. | हिंदी | 2 | 2 | ---- |
| 4. | संस्कृत | 1 | 1 | ---- |
| 5. | राज्यशास्त्र | 4 | 2 | 2 ST |
| 6. | भूगोल | 4 | 2 | 2 OBC |
| 7. | अर्थशास्त्र | 5 | 3 | 2 OBC |
| 8. | कॉमर्स | 7 | 3 | 2 OBC, 2 SEBC |
| 9. | पदार्थविज्ञान | 8 | 2 | 2 ST, 2 OBC, 2 SEBC |
| 10. | रसायनशास्त्र | 7 | 1 | 2 ST, 2 VJA, 2 OBC |
| 11. | वनस्पतीशास्त्र | 3 | 1 | 2 SEBC |
| 12. | प्राणिशास्त्र | 3 | 1 | 2 SC |

**शर्ती व अटी :**

१. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलल्या क्र. संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि. १४.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत असून या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

२. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा. क्र. विससं/उशि/कोवि/३०५२ दि. १५/०७/२०१९ अन्वये ना—हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार ही जाहिरात देण्यात येत आहे. शासनाच्या या ना—हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

३. जाहिरातीतील विविध विषयांच्या तासिका तत्वावरील पदसंख्येत कोणत्याही कारणास्तव बदल होऊ शकतो.

४. तासिका तत्वावरील शिक्षकांची (CHB) एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल व तदनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क तासिका तत्वावरील नियुक्त शिक्षकास प्राप्त होत नसून भविष्यात कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी त्यास करता येणार नाही.

५. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या शिक्षकाने एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करत असल्याबाबतचे, इतर महाविद्यालयामध्ये काम करत नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १०० च्या स्टॅप पेपरवर संस्था/महाविद्यालय यांना सादर करणे आवश्यक आहे.

६. उपरोक्त पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हता, तासिका तत्वावरील वेतन इ. यासंदर्भातील बाबी शासन नियमानुसार राहतील.

७. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांची गणना खुल्या/अराखीव प्रवर्गात केली जाईल. आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रे सादर करावीत.

८. सदरची तासिका तत्वावरील पदे भरत असताना एखाद्या मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर होणारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर अन्य उपलब्ध मागास प्रवर्गातील उमेदवाराचा मुलाखतीमधील प्राविण्यावर आधारीत तात्पुरत्या नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

९. सदरची जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) अर्जदारांना पाहणीसाठी उपलब्ध आहे.

१०. इच्छुक उमेदवारांनी दि.०२/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता अर्ज व आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्स प्रतींसह संस्था/महाविद्यालयात उपस्थित रहावे.

स्थळ:

दिनांक :

प्राचार्य
किसन वीर महाविद्यालय, वाई

APPROVED
Dy. Registrar
Special Cell
Shivaji University, Kolhapur

17 JUL 2019